# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.11.2024** **वारःशनिवार**

---

1. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सत्ताधारी आणि विरोधकांकडून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी,
2. महायुती सरकार वंचितांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याची पंतप्रधानांची धुळ्यातील सभेत ग्वाही,
3. मतदार जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' या विशेष अभियानाची राज्यस्तरीय सुरुवात,
4. पुण्यात येत्या 12 तारखेपासून राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धांचं आयोजन, आणि
5. दक्षिण अफ्रिकेविरुद्ध पहिला टी-ट्वेंटी सामना भारतानं जिंकला.

**<u>मोदी-धुळे</u>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांचा जोरदार प्रचार सुरू असून दिग्गज नेत्यांच्या जाहीर सभांमधून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडताना दिसत आहेत. देशात कॉंग्रेस जाती विभाजनाचा धोकादायक खेळ खेळत असल्याची घणाघाती टीका भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल धुळे इथल्या प्रचार सभेत केली. एनडीए सरकार आणि राज्यातील महायुती सरकार वंचितांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला. त्यानंतर नाशिक इथंही पंतप्रधानांची सभा झाली. उज्ज्वला योजना, हर घर जल योजना, पंतप्रधान आवास योजना अशा विविध योजनांचा राज्यातल्या लाखो लाभार्थींना लाभ होत आहे, असं ते म्हणाले. शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या केंद्राच्या पीएम किसान योजनेतून आणि राज्यातल्या महायुती सरकारच्या नमो शेतकरी योजनेंतर्गत दरवर्षी 12 हजार रुपयांची आर्थिक मदत मिळत आहे. महायुती पुन्हा सत्तेत आल्यास ही मदत वार्षिक 15 हजार रुपये करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. पायाभूत प्रकल्पांसाठी सरकारची कटिबद्धता अधोरेखित करून हे प्रकल्प रखडल्याबद्दल महाविकास आघाडीवर त्यांनी जोरदार टीका केली. पंतप्रधान मोदी यांची आज अकोल्यात जाहीर सभा होणार आहे.

**<u>अमित शहा-सांगली</u>**

'राज्याच्या विकासाची गती कायम राखण्यासाठी महायुतीला विजयी करावं,' असं आवाहन भाजपा नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल सांगली जिल्ह्यातील शिराळा इथल्या जाहीर सभेत केलं. हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी पंतप्रधानांनी हळद महामंडळ तयार केलं असून त्याची शाखा सांगलीत होणार असल्याचं शहा यांनी सांगितलं. त्यानंतर सातारा जिल्ह्यात दक्षिण कराड इथंही शहा यांची सभा झाली. कॉंग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी महाराष्ट्रावर अन्याय केला असून त्यांना जनतेने जाब विचारावा, असं आवाहन शहा यांनी केलं.

**<u>पवार–पटोले सभा-परभणी</u>**

राज्यात आणि देशात महिला सुरक्षित नसून भ्रष्टाचार वाढला आहे अशी टीका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. ते काल परभणी जिल्ह्यात सेलू इथं प्रचारसभेत बोलत होते. महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर महिलांना दरमहा तीन हजार रुपये, बसचा मोफत प्रवास, जातनिहाय जनगणना करून 50 टक्के

आरक्षणाची मर्यादा काढून आरक्षण, कृषी समृध्दी योजनेत 3 लाखांपर्यंत कर्जमाफी, बेरोजगार तरुणांना 4 हजार रुपये मदत हे निर्णय घेणार असल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं.

महाविकास आघाडीची सत्ता राज्यात आल्यास लातूरला सोयाबीनचं विशेष केंद्र उभारणार असल्याचं आश्वासन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिलं. लातूर शहर विधानसभेचे काँग्रेस उमेदवार अमित देशमुख यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते.

**फडणवीस / गडकरी सभा-अमरावती, गोंदिया, नागपूर**

'आगामी काळात महाराष्ट्रात एक कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचं उद्दिष्ट आपल्या सरकारनं ठेवलं आहे,' असं प्रतिपादन भाजपाचे वरिष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अमरावती इथं जाहीर सभेत बोलताना केलं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल गोंदिया जिल्ह्यात प्रचार सभा घेतली. 'लोकसभेच्या वेळी विरोधी पक्षांनी लोकांची दिशाभूल केली असून आपल्याला पक्षांवर टीकाटिप्पणी न करता विकास करायचा आहे,' असं ते म्हणाले.

दरम्यान, 'माझी लाडकी बहीण, माझा लाडका शेतकरी या योजना महायुती सरकारनं आणल्या. परंतु काँग्रेस सरकारनं कर्नाटक, राजस्थान इथं अशा योजनांची आश्वासनं पूर्ण केली नाहीत, हे सर्वांना माहीत आहे,' अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नागपूरमध्ये केली.

**मुख्यमंत्री-धारशिव**

'राज्यात महायुतीचं सरकार आल्यावर पहिल्या शंभर दिवसांचा आराखडा मांडून त्यानुसार काम करणार' असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल धारशिव इथल्या प्रचार सभेत सांगितलं. महागाई आटोक्यात ठेवू, 25 लाख रोजगार निर्मिती करू आणि लाडक्या बहिणींना एकवीशसे रुपयांच्या मदतीचं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**उद्धव ठाकरे**

शिवाजी महाराजांचा पुतळा उभारताना महायुती सरकारनं भ्रष्टाचार केल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी काल बुलढाणा इथं केला. पीकविमा, सोयाबीनला भाव, शेतकऱ्यांना कर्जमाफी, कोरोना काळात औषधं अशी कामं आपल्या सरकारनं केल्याचं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

**राजठा करे-रत्नागिरी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर तालुक्यात प्रचारसभा घेतली. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी चिपळूणमध्ये प्रचार सभा घेतल्या.

**मतदार-जनजागृती**

मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी सुनियोजित कार्यक्रम म्हणजे स्वीप अंतर्गत, मतदार जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' या विशेष अभियानाची राज्यस्तरीय सुरुवात काल मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथं मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. 'ये पुढे, मतदान कर' या महाराष्ट्र मतदान गीताचं लोकार्पण यावेळी करण्यात आलं. मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मतदार जनजागृती अभियान कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. विविध नामवंत कलाकार, अभिनेते तसंच मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध कलांच्या सादरीकरणातून मतदार जनजागृतीचा संदेश देण्यात येणार आहे.

**<u>गृह मतदान-वाशिम</u>**

वाशिम जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी काल गृहमतदान पार पडलं. निवडणूक अधिकाऱ्यांनी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया राबवली. धुळे शहरात 10 नोव्हेंबर रोजी गृह मतदान होणार असून, यासाठी चौदा पथकं नेमण्यात आली आहेत.

**<u>किरणोत्सव-कोल्हापूर</u>**

करवीर निवासिनी श्री अंबाबाई महालक्ष्मीच्या दक्षिणायन किरणोत्सवास कालपासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी मावळत्या सूर्याची किरणं देवीचे चरणस्पर्श करुन थोडी वर सरकत लुप्त झाली. हा अनोखा सोहळा सूर्यास्तापूर्वी काही क्षण अनुभवता येतो. सूर्याची सोनेरी किरणे पहिल्या दिवशी आईच्या चरणावर, दुसऱ्या दिवशी छातीवर आणि तिसऱ्या दिवशी मुखकमलाला स्पर्श करतात. गेली कित्येक शतके अव्याहत सुरू असलेला सुंदर, अलौकिक उत्सव 8 ते 12 नोव्हेंबर या काळात साजरा केला जातो. हा किरणोत्सव पाहण्यासाठी भाविक आणि पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती.

**<u>वंदेमातरम्</u>**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा युद्धघोष असणाऱ्या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या काव्य निर्मितीच्या 150 व्या वर्षातील पदार्पणानिमित्त एका अभिवाचनात्मक दृकश्राव्य कार्यक्रमाचं काल पुण्यात भारतीय इतिहास संकलक समितीद्वारे आयोजन करण्यात आलं होतं. वंदे मातरम् हे गीत फक्त शब्दरूपी नसून हा प्रचंड मोठा उर्जा स्रोत आहे, आजच्या सामाजिक स्थितीत प्रत्येकाच्या मुखी वंदे मातरम्‌चा गजर होणं आवश्यक आहे, अशी अपेक्षा अभ्यासक-संशोधक मिलिंद सबनीस यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>दिव्यांग नेमबाजी</u>**

तीक्ष्ण नजर आणि एकाग्रता ही नेमबाजी या खेळाची बलस्थानं... पण नजरच नसेल तर ? पण तरीही हा खेळ खेळता येऊ शकतो आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकही मिळवता येऊ शकतं हे दिव्यांग नेमबाजांनी सिद्ध करून दाखवलं आहे. अशीच चमकदार कामगिरी करणाऱ्या दिव्यांगाच्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा पुण्यात रंगणार आहेत. ऐकुया याविषयीचा अधिक वृत्तान्त...

**पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलात 12 ते 16 नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धा होत आहेत. टोकियो आणि पॅरिस पॅरालिंपिक सुवर्ण पदक विजेत्या खेलरत्न पुरस्कार विजेत्या अवनी लेकरा, पॅरिस पॅरालिंपिक रौप्य पदक विजेते मनिषा नरवाल, कांस्यपदक विजेत्या रुबिना फ्रांसिस, टोकियो पॅरालिंपिक रौप्य, कांस्यपदक विजेते, अर्जून पुरस्कार विजेते सिंहराज अंधाना यांचा खेळ पाहण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या सहकार्याने होणाऱ्या या स्पर्धेत दिव्यांग खेळाडूंना विशेष सुविधा देण्यात आल्या. ज्यांना दृष्टी नाही अशा खेळाडूंसाठी बंदूक आणि लक्ष्य यांच्यावर सेन्सर बसवण्यात आले. या सेंसर कडून येणाऱ्या संकेताच्या सहाय्याने या नेमबाजपटूंना नेम साधण्यासाठी मदत होणार आहे. ज्यांना हात नाही अशा अपंग नेमबाजपटूंसाठी स्प्रिंग आणि टेबलची योजना करण्यात आली असून खांद्याच्या सहकार्याने ट्रिगर करून नेम साधता येणार आहे. यासह अनेक तांत्रिक बाबा मध्ये खेळाडूंच्या सोयीसाठी फेरफार करण्यात आले. ही स्पर्धा दहा मीटर 25 मीटर आणि 50 मीटर रायफल आणि एअर पिस्टल प्रकारात होणार आहे. स्पर्धेत दहा पॅरा ऑलिंपियन खेळाडू 40 अंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच देशभरातून 500 राष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार आहेत.**

**महाराष्ट्राकडून 55 खेळाडू सहभागी होणार असून स्वरूप उन्हाळकर, संतोष गाढे, सागर कातळे, नरेंद्र गुप्ता यांच्या कडून पदकांची अपेक्षा आहे. अकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून सीमा चोरडिया.**

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट संघ सध्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. डर्बन इथं काल झालेल्या 4 सामन्यांच्या 20 षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना भारतानं 61 धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं 202 धावा केल्या. संजू सॅमसनने 50 चेंडूत 107 धावा केल्या. यात त्यानं 10 षटकार लगावले. क्रिकेटच्या या प्रकारात सलग दुसऱ्यांदा शतक झळकवणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. प्रत्युत्तरादाखल दक्षिण आफ्रिका संघाने सर्व गडी गमावत 141 धावा केल्या. वरुण चक्रवर्ती आणि रवी बिष्णोई या फिरकीपटूंनी प्रत्येकी 3 तर आवेशखाननं 2 गडी बाद केले. मालिकेतील पुढचा सामना उद्या खेळला जाणार आहे.

**हवामान**

राज्याच्या काही भागांमध्ये किमान तापमान 15 अंशांच्या खाली नोंदवलं गेलं. नाशिक इथं सर्वात कमी 14 पूर्णांक 6 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.